फिरकी गोलंदाजांचे अपयश चिंताजनक

वरुण, अक्षरची लय हरवल्याने अडचणीत भर; वेगवान गोलंदाजांकडून अपेक्षा

एक्सप्रेस वृत्त

चेन्नई : विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आव्हान राखण्यासाठी विजय आवश्यक असलेल्या सामन्यात भराताच्या फलंदाजीला लय गवसली, मात्र विशाल आव्हानाच्या बचाव करताना भारतीय गोलंदाजी विशेषत: फिरकी गोलंदाज लय गमावून बसलेले दिसून आले. उपांत्य फेरीसाठी आता रविवारी वेस्ट इंडिजविरुद्ध विजय आवश्यक असलेल्या आणखी एका सामन्यापूर्वी ही बाब निश्चितच चिंताजनक आहे.

भारताच्या आघाडीच्या फळीतील प्रत्येकाने धावा केल्या. मात्र, आव्हानाचा बचाव करताना गोलंदाजांनी झिम्बाब्वेची फलंदाजी सहज घेतल्याचे जाणवत होते. अनेक त्रुटी दिसून आल्या. क्षेत्ररक्षण सुमार होते, झेल सुटला आणि शिवम दुबेचा यापर म्हणजे निव्वळ खेळ वाटला. विजयानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने या गोष्टी मान्य केल्या. आम्ही चेंडूने अधिक परिपूर्ण असायला हवे होते. पण, विजय तो विजयच असतो. वेस्ट इंडिजविरुद्ध सामन्यापूर्वी आम्हाला चुका सुधारण्या लागतील. गोलंदाजीच्या

आघाडीवर आम्हाला अधिक चतुराई दाखवणे आवश्यक होते. आम्हाला धाडस दाखवावेच लागेल, असे सूर्यकुमार म्हणाला.

भारताचा निर्णायक सामना रविवारी वेस्ट इंडिजविरुद्ध होणार आहे. त्यांची आतापर्यंतची कॅरिबियन शैलीतील ताकदवान फलंदाजी पाहिली, तर गोलंदाजीतील एखादी छोटीशी चूकही महागात पडू शकते.

भारताच्या वेगवान गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली. अर्शदीपने चेंडू दोन्ही बाजूने स्विंग केला. हार्दिक पंड्याला पहिल्याच चेंडूवर षटकार बसला, पण नंतर त्याने पुढील ११ चेंडूत फक्त सहा धावा दिल्या. इथेच पहिल्या चार षटकांनंतर झिम्बाब्वेची आव्हानाचा पाठलाग करण्याची शक्यता मावळली होती. षटकामागे तेराची धावगती झिम्बाब्वेला आवश्यक होती. त्यानंतरही झिम्बाब्वे संघाने मोठी मजल मारली. भारत ७२ धावांनी जिंकला. गोलंदाजीची तादत लक्षात घेता हा विजय अधिक मोठा असायला हवा होता. या विजयाने आत्मविश्वासपेक्षा भारताला आव्हान राखल्याचा दिलासा मिळाला इतकेच महत्त्वाचे होते.

चिंतेचे कारण

भारताला दिलासाच मिळाला इतके म्हणण्याचे कारण म्हणजे खराब सुरुवातीनंतरही झिम्बाब्वेने ६ बाद १८४ धावांची मजल मारली. आपण झिम्बाब्वेचा डाव गुंडाळू शकलो नाही. फलंदाजी परिपूर्ण दिसून आली तरी मोठ्या खेळीबाबत भारतीय कमनशिबीच राहिले. तुलनेने बेनेटने नाबाद ९७ धावांची खेळी करून प्रभाव पाडला. वेगवान गोलंदाजांनी १० षटकांत ६६ धावा दिल्या, तर फिरकी गोलंदाजांनी आठ षटकांत ७० धावा दिल्या. विश्वचषक स्पर्धेत सामन्यात गोलंदाजी कशी नसावी अशी दोन षटके शिवम दुबेने टाकली. कदाचित गोलंदाज यापेक्षा नेटमध्ये चांगली गोलंदाजी करतात. इतकी दुबेची गोलंदाजी वाईट होती. त्याच्या दोन षटकांत ४६ धावा निघाल्या. फिरकी गोलंदाजीत अक्षरला पुनरागमन साजरे करता आले नाही, तर वरुण डेव्हिड मिलरच्या प्रतिहल्ल्यातून अजून सावरला नसल्याचे दिसून आले. क्षेत्ररक्षणात एक-दोन वेळा चेंडू चौकार जात असताना क्षेत्ररक्षक चेंडूपर्यंत पोहचू देखील शकत नव्हते. तेव्हा सूर्यकुमारचा चेहरा खूप काही सांगून जात होता.

झिम्बाब्वेकडे बेनेटसारखा आणखी एक फलंदाज असता, तर हा सामना नक्कीच अटीतटीचा झाला असता. प्रतिस्पर्धी दुबळ्या आहे म्हणून त्याला इतके सहज घेणे योग्य नाही. विश्वचषकासारख्या स्पर्धेत कुतल्याही सामन्यात प्रतिस्पर्ध्यावर सगळी कामगिरी करावयी नसते. झिम्बाब्वेकडे दुसरा आक्रमक फलंदाज नव्हता, पण वेस्ट इंडिजचे तसे नाही. त्यांच्याकडे अखेरचा खेळाडू देखील टोलेबाजी करू शकतो हे यात स्पर्धेत दिसून आले आहे.

जम्मू-काश्मीर विजेतेपदाच्या उंबरठ्यावर

कर्नाटकविरुद्ध चौथ्या दिवसअखेरीस ४७७ धावांची आघाडी

पीटीआय, हुबळी

फलंदाजीतील निर्विवाद वर्चस्वानंतर हंगामात कमालीच्या लवीत असलेल्या वेगवान गोलंदाज अकिब नबीच्या (५/५४) भरीव कामगिरीच्या जोरावर जम्मू-काश्मीर संघ आता रणजी विजेतेपदाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. चौथ्या दिवसअखेरीस जम्मू-काश्मीरकडे ४७७ धावांची भक्कम आघाडी आहे. पहिल्या डावात धावांचा डोंगर उभा केल्यावर जम्मू-काश्मीरच्या गोलंदाजांनी कर्नाटच्या अनुभवी फलंदाजांनाही जेरीस आणले.

नबीच्या आणखी एका भेदक गोलंदाजीच्या जोरावर जम्मू-काश्मीरने कर्नाटकचा पहिला डाव २९३ धावांत गुंडाळून पहिल्या डावात २९१ धावांची मोठी आघाडी घेतली. तिसऱ्या दिवसअखेरच्या ५ बाद २२० धावांवरून पुढे खेळायला सुरुवात केल्यावर सलामीचा फलंदाज मयांक अग्रवालच्या (२६६ चेंडूत १६०) भोवतीच कर्नाटकचा डाव फिरत होता. मयांकची वैयक्तिक खेळी अप्रतिम ठरली असली, तरी दुसऱ्या बाजूने काहीच साथ न मिळाल्यामुळे

त्याची खेळी व्यर्थ ठरली. हंगामात चांगल्या लवीत राहिलेल्या नबीने आणखी एकदा डावात पाच गडी बाद करण्याची कामगिरी करताना जम्मू-काश्मीरला विजेतेपदाच्या जवळ नेले.

मोठी आघाडी घेतल्यानंतरही जम्मू-काश्मीर संघाने फॉलोऑन देण्याचे टाळले आणि दुसऱ्या डावातही फलंदाजीचा सराव करून घेतला. अर्थात, त्यांच्या दुसऱ्या डावाची सुरुवात चिंताजनक झाली. यावर हसन (१) आणि शुभम पुंडीर (४) झटपट बाद झाले. त्यानंतर कामरान इक्बाल आणि कर्णधार पारस डोगर यांनी तिसऱ्या गड्यासाठी ६१ धावांची भागीदारी करून संघाचा डाव सावरला. या भागीदारीत पारसचा वाटा फक्त १६ धावांचा होता. पारस बाद झाल्यावर कामरान आणि अब्दुल समद यांनी आणखी एक ७३ धावांची भागीदारी करताना जम्मू-काश्मीरचा डाव स्थिर केला. दिवसाच्या अखेरच्या सत्रात अब्दुल समद (३२) बाद झाला. पण, त्यानंतर कामरने साहिल लोत्रान साथीला घेत संघाचे आणखी नुकसान टाळले. जम्मू-काश्मीरने चौथ्या दिवसअखेरीस ४ बाद १८६ धावांची मजल मारुन ४७७ धावांची भक्कम आघाडी घेतली. खेळ थांबला तेव्हा कामरान ९४, तर साहिल १६ धावांवर खेळत होता.

सामन्याचा आज, शनिवारी अखेरचा दिवस असून, सामना निर्णायक होण्याची शक्यता नाहीच. त्यामुळे पहिल्या डावाच्या आधिक्यावर जम्मू-काश्मीर संघाचा विजेतेपदावर शिक्कामोर्तब होईल.

ऑस्ट्रेलियन महिला संघाचा विजय

होबार्ट : जॉर्जिया वोलच्या (८२ चेंडूत १०१ धावा) निर्णायक शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियन महिला संघाने भारताला दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात पाच गडी व ८३ चेंडू राखून विजय मिळवला. या कामगिरीमुळे त्यांनी तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली.

भारताने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद २५१ धावा केल्या. प्रतिका रावलच्या ५२ धावांच्या खेळीमुळे भारताने यांनाही सुरुवातीले. मात्र, मधल्या षटकांमधील संघाची कामगिरी दाखलण्ली. हरमनप्रीत कौरने ७० चेंडूत दोन चौकार व एक षटकारासह ५४ धावा केल्या. यानंतर लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने जॉर्जिया व

फोबे लिचफील्ड (८०) यांच्या योगदानामुळे ३६.१ षटकांत ५ बाद २५२ धावा करीत सहज विजय नोंदवला. याप्रमाणे ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध द्विदेशीय एकदिवसीय मालिकेतील आपली यांगली कामगिरी सुरूच ठेवली. ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत भारताविरुद्ध १२ द्विदेशीय मालिका जिंकल्या आहेत.

अरविंदची निमनवर मात

प्राग : भारताच्या अरविंद चिदम्बरमने प्राग बुद्धिबळ स्पर्धेच्या मास्टर्स गटाच्या दुसऱ्या फेरीत अमेरिकेच्या हान्स निमनला नमवीत सवांचे लक्ष वेधले. भारताचा जगज्जेता दोम्माराजू गुकेशला उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसतोरोवविरुद्ध बरोबरीवर समाधान मानावे लागले.

निमनने अरविंदविरुद्ध पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना सुरुवातीला आघाडी घेतली. मात्र, अरविंदने आपला बचावात्मक खेळ सुरूच ठेवला. निमनकडे एकवेळ वेळेची कमतरता जाणवू लागली. याचा फायदा घेत अरविंदने निमनला पुनरागमनाची संधी न देता विजय साकारला. गुकेश सलग दुसऱ्यांदा पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळत होता. पण, त्याचा फायदा गुकेशला घेता आला नाही. अन्य सामन्यात स्पेनच्या डेव्हिड अँटन गुझारोने नेदरलँड्सच्या जॉर्डन वॅन फॉरेस्टला नमविले. आता स्पर्धेच्या सात फेऱ्या शिल्लक असून आतापर्यंत अब्दुसतोरोव, फाबियोच्या आणि स्थानिक खेळाडू डेव्हिड नवारा १.५ गुणांसह संयुक्त आघाडीवर आहे. या तिघांनंतर गुकेश, अरविंद, वॅन फॉरेस्ट आणि गुझारो यांचा क्रमांक येतो. ते आघाडीवर असणाऱ्या खेळाडूंच्या अर्ध्या गुणांनी मागे आहे. इशणचा परहम मघसूदूत्, जर्मनीचा अझमानॉकित व्हिन्सेन्ट केमर्स आणि नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन यांनी नमविले.

फक्त ₹ 50* / 800 g
अमूल दही
किंमतीत उपलब्ध
₹50
Amul
DAHI
"CREAMY AND TASTY"
*GST Incl. Other Taxes extra.

बँक ऑफ बड़ौदा
Bank of Baroda

शाखा-एम.आय.डी.सी.अमरावती
प्लाट नं. 39, सर्व्हे नं. 24, 36, मौजा राजापेठ, अमरावती, दूरध्वनी नगर रोड, पिन - 444606

ताबा सूचना (प्रत्यक्ष)
(सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 8 (1))

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन अंन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेट्स अंन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऐक्ट 2002 (दुसरा) (सरफेसी) च्या अंतर्गत खालील हस्ताक्षरकर्ता हे बँक ऑफ बड़ौदा चे अधिकृत अधिकारी आहे. तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रूल्स 2002 चे नियम 13(12) च्या सोबतच वाचला जाणारे रूल 9 च्या अंतर्गत **श्री. आंगस्टीन अलेक्जांडर मोझेस (कर्जदार)** यांना **डिमांड नोटिस दिनांक 11/11/2025** ला देऊन सुचवेत दर्शविलेली रक्कम **रु. 31,23,053.00 (रुपये एकतीस लाख तेविस हजार त्रेपन्न फक्त) + लागु न झालेले व्याज + सेवा न झालेले व्याज + इतर शुल्क** ही सुचना प्राप्तीनंतर 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना मध्ये दर्शविलेल्या तारखेला दिली होती.

संपूर्ण रक्कमेची भरपाई करण्याकरीता कर्जदार असमर्थ सिध्द ठरल्यामुळे तसेच आम्ह जनतेला याव्दारे सुचना देण्यात येते की, खालील दिलेल्या कायद्याच्या उपकलम 13(4) अंतर्गत सह वाचला जाणाऱ्या अॅक्ट रूल 9 च्या अंतर्गत हस्ताक्षरकर्त्याने दिलेल्या संपत्तीचा **प्रत्यक्ष ताबा हि. 25 फेब्रुवारी 2026** ला घेतला आहे.

विशेष करून कर्जदार तसेच आम जनतेला या व्दारा करीत संपत्तीच्या विषयी कोहीही घेने देने न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रकमेवरील व्याजाचे व इतर अधिभार सहित बँक ऑफ बड़ौदा चे **रु. 31,23,053.00 (रुपये एकतीस लाख तेविस हजार त्रेपन्न फक्त) + लागु न झालेले व्याज + सेवा न झालेले व्याज + इतर शुल्क**

अचल संपत्तीचे विवरण

इक्विटेबल गहाण निवासी फ्लॅट, सर्वेक्षण क्रमांक 159/1, 159/2, 160, 162, 164/2 असलेले, फ्लॅट क्रमांक 4 / फ्लॅट क्रमांक 715, प्रशासकीय जमीन चौरस मीटर, बिल्ड अप क्षेत्र 62.22, कार्पेट क्षेत्र 62.22 येथे स्थित, जे फ्लॅट / अपार्टमेंट 715 वर स्थित आहे, 669.73 चौरस फूट बिल्ट अप क्षेत्र व्यापते. (62.22 चौ.मी.) आणि अति-निर्मित क्षेत्रफळ 928.82 चौ.मी. (86.29 चौ.मी.) आणि 0.13% प्रमाणित अविभाजित जमिनीस, जी डायमंड बिल्डिंग म्हणून नावाच्या आणि शैलीतील इमारतीच्या 7 व्या मजल्यावर आहे, जी जमिनीवर बांधली गेली आहे, जी बिगर-कृषीमध्ये रुपांतरित झाली आहे, पासाडी तहसीलदार, अमरावती यांनी दिनांक 06.10.2016 रोजी दिलेल्या आदेशानुसार रेव्ह. केस क्रमांक एन ए पी 34/बडनेरा-3/2016-17, आउट ऑफ फीस्ट सर्व क्रमांक 159/1, 159/2, 160, 162, 164/2 मध्ये मंजूर, मौजे बडनेरा, प्रगणे बडनेरा, तहसील आणि जिल्हा अमरावती येथील ही मालमत्ता उपनिबंधक, अमरावती यांच्या हद्दीत आहे. मालमत्ता श्री ॲण्टॉन अलेक्झांडर मोझेस यांच्या मालकीची आहे. **चर्तुसिमा खालीलप्रमाणे :** पूर्व: बडनेरा-अमरावती बायपास रोड, पश्चिम: सर्व क्रमांक 161 आणि 163 चा भाग, उत्तर: सर्व क्रमांक 157 आणि 158 चा भाग, दक्षिण: सर्व क्रमांक 163 चा भाग

दिनांक : 25/02/2026
स्थळ : अमरावती

(इंग्रजीतील मूळ मजकूर प्राप्त झाल्यावर देईल)

अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा

बँक ऑफ इंडिया
नात बँकिंग पलिकडचं

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस, महावीर उद्यान समोर रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : zo.vldarbha@bankofindia.bank.in

सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तांची मेगा स्टार ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन अंन्ड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अंन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 8(2) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषत: खालील कर्जदारांना /सह-कर्जदारांना /जामीनदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा सांकेतिक आणि भौतिक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "च्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी (प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

ई-लिलावाची वेळ: समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सदर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह (मालमत्तेच्या तपासणीसाठी विनंती **ARD.Vldarbha@bankofindia.bank.in** या ई-मेल आयडीवर आणि /किंवा श्री प्रकाश खाडीलकर मो.9826322490, श्री शुभम मस्के मो.8237771144 यांच्याशी संपर्क साधून करता येईल.)

कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदाराचे नांव मालमत्ता आयडी, शाखेचे नाव	संपत्तीचे विवरण	एकूण थकबाकी	ताबा प्रकार	राखीव किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.	ई-लिलावाची तारीख आणि वेळ
कर्जदार : श्री रामिकिटु मलया कुमार **BKIDVIDRAJ03** शाखा :राजुरा	एक मंजिल निवासीय बिल्डींग प्रापर्टी नं.46/1 (भाग) (पुर्वकडील भाग), रामनगर कॉलनी वार्ड नं.10, आशिषबाबाद रोड, रा. व तह.राजुरा, जि.चंद्रपूर अंदाजे आराजी 187.36 स्के.मि. (प्लॉट) आणि 86.54 स्के.मि. (बिल्ट अप) श्री रामिकिटु मलया कुमार यांच्या नावाने. (कर्जदार-गहाणदार)	रू. 9.53 लक्ष थकीत रक्कम + एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज	सांकेतिक	रु. 24,65,000/-	रु. 2,46,500/-	दिनांक 25.03.2026 (सकाळी 11.00ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)
कर्जदार/गहाणदार : श्री मंशुर खा मोहम्मद खा जमानतदार : श्री मोहम्मद सलमान जावेद इकबाल **BKIDAKO164** शाखा : अकोला	संपत्तीचा सर्व भाग व तुकडा निवासीय प्लॉट/ प्रापर्टी प्लॉट नं.402, चवथा माळा, गुरु रेसिडेंसी, शेट एच.नं.44/1, 44/2 व 44/3, प्लॉट नं.डी, मौजा अकोली खुर्द, तह. व जि. अकोला, प्लॉट चा अंदाजे आराजी 79.46 स्के.मि. श्री मंशुर खा मोहम्मद खा यांच्या नावाने.	रू. 19.15 लक्ष थकीत रक्कम + एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज	भौतिक	रु. 10,51,000/-	रु. 1,05,100/-	दिनांक 25.03.2026 (सकाळी 11.00ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)
कर्जदार : श्री शेख फारुक शेख करीम सहकर्जदार : श्रीमती वाहीदा फिरदोस शेख फारुक जमानतदार : श्री रशिद अहमद मो.हुबैन **BKIDGOR40** शाखा : गोरक्षण रोड	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि बिल्डींग, फिक्चर्स, रोड आणि स्ट्रक्चर्स मध्ये निवासीय प्लॉट नं.02, तळ माळा, अरकश रेसिडेंसी, प्लॉट नं.51 मी (भाग) 52, 53, 54, सर्व्हे नं.44/2, मौजा आकोली खुर्द, आनंद वाटीका च्या मागे, गांधिन बायपास रोड, मिल्लतनगर, डोंगरे लेआऊट, अकोला, तह. आणि जि.अकोला-444001 श्री शेख फारुक शेख करीम (कर्जदार-गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 13.64 लक्ष थकीत रक्कम + एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज + इतरआनुषंगिक खर्च	सांकेतिक	रु. 10,88,000/-	रु. 1,08,800/-	दिनांक 25.03.2026 (सकाळी 11.00ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)
कर्जदार/गहाणदार : श्री सौरभ सुनिल देशमुख सह-कर्जदार : श्रीमती राखी छगन शुक्ला **BKIDVIDEO01** शाखा :देवरानकर नगर	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि बिल्डींग, फिक्चर्स, रोड आणि स्ट्रक्चर्स मध्ये निवासीय प्लॉट नं.303-बी,चवथा माळा, सुमेरु मंगलम, प्लॉट नं.10 ए, 10 बी, 11 ए, सर्व्हे नं.42/1, शाहू लेआऊट, वैष्णव कॉलनी च्या मागे, गोंड बाबा मंदीर समोर, मौजा जेवारा, प्रगणे बडनेरा, मिनी बायपास रोड, तह. आणि जि.अमरावती अंदाजे आराजी 781.46 स्के.फीट (बिल्टअप) श्री सौरभ सुनिल देशमुख (कर्जदार/ गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 33.14 लक्ष थकीत रक्कम + एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज + इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 26,30,000/-	रु. 2,63,000/-	दिनांक 25.03.2026 (सकाळी 11.00ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)
कर्जदार : श्री शेख रशिद शेख मेहबुब गहाणदार : श्रीमती शबाना रशिद शेख **BKIDVIDBAM02** शाखा : बाभुळी	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि बिल्डींग, फिक्चर्स, रोड आणि स्ट्रक्चर्स मध्ये प्लॉट नं.07, सर्व्हे नं.41/1, टी.एस.नं.05, मौजा उमरी रोड/लालमन, हनुमान मंदीर जवळ, गुरु हॉट सिक्स प्लॉट च्या मागे, तडाली मशाद बोकर क्रिज जवळ, नागपूर रोड, उमरी, तह. आणि जि.चंद्रपूर अंदाजे आराजी 2626.17 स्के. फीट श्रीमती शबाना रशिद शेख (गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 8.53 लक्ष थकीत रक्कम + एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज + इतरआनुषंगिक खर्च	सांकेतिक	रु. 2,30,000/-	रु. 23,000/-	दिनांक 25.03.2026 (सकाळी 11.00ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)
कर्जदार/गहाणदार : श्री प्रतिक प्रकाश लोणकर **BKIDNACHPRATIK** शाखा : नाचणगांव	जागेचा सर्व भाग आणि तुकडा एक ए जागा प्लॉट नं. 21, सर्व्हे नं.363/2, अंदाजे आराजी 175.00 स्के.मि. मौजा नाचणगांव, देशपांडे लेआऊट, तुकडोजी महाराज मंदीर जवळ, पंचवाडा रोड, नाचणगांव,तह. देवळी आणि जि.वर्धा-442306 श्री प्रतिक प्रकाश लोणकर (कर्जदार/गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 11.04 लक्ष थकीत रक्कम + एनपीए च्या तारखेपासून न लागलेले व्याज + इतरआनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 12,50,000/-	रु. 1,25,000/-	दिनांक 30.03.2026 (सकाळी 11.00ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत)

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1) ई-लिलाव "जे आहे जेथे आहे, आणि" "जे काही आहे ते आहे आणि "च्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल.
2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करन घेण्यासाठी कृपया **https://bankofindia.bank.in** ला भेट द्या.
a) ई-लिलाव सेवा पुरवठा दाराच्या वेबसाईटचा पत्ता : **https://baanknet.com/.** बोलीदार हे **https://baanknet.com/** येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील ऑफलाईन आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
टप्पा - 1 : बोलीदारांसी नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईएफटी/हस्तांतरण ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकाल: इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपुर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत.
3) अधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती प्रमाणे, स्थावर मालमत्तांवर कोणताही ऋणभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांवरील ऋणभार, नामनिर्देशन आणि दावे /अधिकार, देणी /मालमत्तेला होणारी बाधा हयाची स्वतंत्रपणे चौकशी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रविष्ट होणे म्हणजे कुणाविही वचनबध्दता असणे किंवा केविही कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सध्याचा आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. विक्री करण्यात येणा-या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दाव्याचा विचार केला जाणार नाही.
4) बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या संदर्भात पाहणी करुन स्वत:ची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार अंबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन मालमत्तेची पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : **04.03.2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.
5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात याव्यात.
6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.
7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.
8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परताव करण्यात येईल.
9) बँकांच्या प्रतिकात्मक तात्पात असलेल्या मालमत्तेच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकारी तर्फे /जिल्हा न्यायालया तर्फे भौतिक ताबा मिळाल्यानंतरच मालमत्तेचा भौतिक ताबा यशस्वी बोलीदाराला सुपुर्द केला जाईल.
10) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) ठेवीवर किंवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून ताबडतोब त्याच दिवशी किंवा काही कारणासाठी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याच भरणा करावी लागेल. खरेदी किंमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यास अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदारांने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास स्वतंत्र आहे.
11) वेबसाईटवरील लिलावाच्या सहभाग आणि बोली लावणे हे असे नमाने जाईल की बोली लावना-याने लिलावाशी संबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.
12) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्कची अडचण/बीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. असे प्रसंग होऊ नये यासाठी इच्छुक बोलीदारांनी विनंती प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सध्याचा आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. विक्री करण्यात येणा-या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दाव्याचा विचार केला जाणार नाही.
13) यशस्वी बोलीदारांच्या प्रारे निश्चित झालेल्या विक्री रकमेचा भरणा बँकेकडे करण्यापूर्वी यशस्वी बोलीदाराकडून आयकर कायदा 1961 च्या कलम 194-I ए च्या अंतर्गत आणि टीडीएस च्या भरणा, बोली रकमेच्या उर्वरित 75% टक्के रकमेचा भरणा करताना करणे गरजेजे आहे. यशस्वी खरेदीदाराला लागू असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, अन्य प्रासंगित शुल्क, सेवाविनाकि शुल्क आणि असवैधानिक शुल्क विवे देणी इत्यादीचा भरणा करावा लागेल.
14) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पुढे ढकलणे/ रदद करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता गाळे घेणे याचा संपूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकारी/बँकेकडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील प्राधिकृत अधिका-यांच्या माहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा उणीवा यांला प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.
15) विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदारांच्या/अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.
16) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस अंन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम/शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंध